स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळातंर्गत संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग व युआयसीटी यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शुक्रवार दि. २४ मार्च रोजी "काश्मीरसाठी चीनची धोरणात्मक योजना" या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सिनेट सभागृहात सकाळी १०:३० वाजता हा परिसंवाद होणार आहे. भारताच्या गृहमंत्रालयाचे माजी सुरक्षा सल्लागार व सर्विस सिलेक्शन बोर्डाचे माजी अध्यक्ष बिग्रेडेयर संजय अग्रवाल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिसंवादात दक्षिण कोरियाच्या एशिया इन्स्टिट्युट, सेऊलचे संचालक डॉ. लखविंदरसिंग, डिफेन्स इन्स्टिट्युट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी पुणे येथील डॉ. शाईबल बॅनर्जी, इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड ॲफेअर्सच्या डॉ. अनघा गुहा रॉय हे व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिसंवादात भारत-चीन सिमावाद, चीनचे काश्मीर धोरण अशा विविध विषयावर वक्ते बोलणार आहेत. या परिसंवादात विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अनिल चिकाटे व युआयसीटी चे संचालक डॉ. जे. बी. नाईक यांनी केले आहे.

## बातमी क्रमांक २

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात मराठी विभागाच्यावतीने दि. २५ मार्च २०२३ रोजी "संशोधन पध्दती" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा एकुण चार सत्रामध्ये पार पडणार आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात उद्घाटक म्हणून डॉ. विद्या गायकवाड (आयुक्त महानगरपालिका, जळगाव) ह्या उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. अनिल डोंगरे, बीजभाषक म्हणून सुप्रसिध्द ग्रामीण साहित्यिक व समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे (छ. संभाजीनगर) हे असतील तर उद्घाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून मराठी विभागप्रमुख प्रा. म. सु. पगारे असणार आहेत.

दुस-या सत्रामध्ये "संशोधन, संशोधक आणि संशोधन प्रक्रिया" या विषयावर प्रा. डॉ. सतीश बडवे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. फुला बागूल (शिरपूर), प्रा. डॉ. संतोष खिराडे (कबचौउमवि, जळगाव) या मान्यवरांचे "संशोधन पध्दती" या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.

तिस-या सत्रामध्ये "संशोधनाचे विविध आयाम" या विषयावर प्रा. डॉ. वासुदेव वले (पाचोरा), डॉ. अनिल चिकाटे (ग्रंथालय, जळगाव), डॉ. सतीश मस्के (पिंपळनेर), डॉ. योगिता पाटील (धुळे), डॉ. अक्षय घोरपडे (जामनेर), डॉ. रमेश माने (अमळनेर) हे संशोधन पध्दती या विषयावर चर्चा करणार आहेत.

चौथ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली समारोप सत्र होणार आहे. डॉ. संतोष चव्हाण (संहसंचालक, उच्चशिक्षण, जळगाव) हे कार्यशाळेत समारोप सत्रासाठी मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत सहभागी होण्याकरीता ऑनलाईन लिंक पुढीलप्रमाणे आहे. https://rzp.io/l/researchworkshop अशी माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. म. सु. पगारे यांनी दिली.

## बातमी क्रमांक ३

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळेतंर्गत मानसशास्त्र विभागातर्फे सोमवार दि. २७ मार्च रोजी "बुध्दिमापन चाचणी" या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

सोमवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए. रवींद्र पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अनिल चिकाटे अध्यक्षस्थानी राहतील. पहिल्या

# जनसंपर्क विभाग

सत्रात बुध्दिमत्ता चाचणी या विषयावर पुणे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मानसोपचार विभागाच्या सायली वझे यांचे व्याख्यान होणार आहे. दुस-या सत्रात डॉ. वीणा महाजन मार्गदर्शन करतील. इच्छुकांनी मानसशास्त्र विभागातील डॉ. अनिल तौर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

## बातमी क्रमांक ४

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्यावतीने उद्या शुक्रवार दि. २४ व २५ मार्च रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

अलझेब्रा, ॲनलिसीस ॲण्ड फजी मॅथेमॅटिक्स या विषयावर होणा-या या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील यांच्या हस्ते सकाळी १०:३० वाजता होणार आहे. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. दोन दिवसाच्या या परिषदेत प्रा. विनायक जोशी, प्रा. वाय. एन. बोरसे, प्रा. शिवदत्तकुमार, प्रा. एस. पी. तिवारी, प्रा. आनंद प्रकाश सिंग आदी मार्गदर्शन करणार असून शनिवारी सांयकाळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या उपस्थितीत समारोप होणार असल्याची माहिती प्रशाळेचे संचालक प्रा. एस. आर. चौधरी यांनी दिली.

## **बातमी क्रमांक ५**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी “नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी अभियान” कार्यशाळा घेण्यात आली.

माजी प्र-कुलगुरू प्रा. पी. पी. माहुलीकर यांनी या कार्यशाळेत बीजभाषण केले. नवीन शैक्षणिक धोरणाची रचना अंमलबजावणी आणि आव्हाने यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अन्य सत्रामध्ये अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्राचार्य डॉ. अशोक राणे यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली समारोप झाला. विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी, कार्यक्रम समन्वयक डॉ. संतोष खिराडे, डॉ. रणजित पारधे, डॉ. स्वाती तायडे, जयश्री पाटील आदी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक:२३ मार्च, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी